**निशाणी क्र. ३०**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ८ (PW–8) यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

नाव – सुनिल मधुकर खोलगडे,

वय – ६१ वर्षे, व्यवसाय – फॅब्रीकेशन काम,

राहणार – नांदुरा, तालुका नांदुरा, जिल्हा बुलढाणा

– – – – –

**<u>सरतपास सरकारी अभियोक्ता श्री.व्ही एम बापट यांच्यामार्फत</u>**

१. चाळीस वर्षांपासून मी फॅब्रीकेशनचे काम करतो. नांदुरा पोलीस ठाण्यात मला बोलाविण्यात आले होते. मला त्या संदर्भात लेखी पत्र दिले होते. ते पत्र दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता दाखविण्यात आलेले पत्र तेच आहे. ते पत्र मिळाल्याबाबत त्या पत्रावर माझी सही आहे. ते पत्र **<u>निशाणी क्र. ३१/पी–४</u>** वर आहे. पलंगाचा ठावा कापून द्यायचा होता. मी त्यासाठी कटर मशिन घेऊन गेलो होतो. साधारण तीन–चार वर्ष झाले असतील, तारीख आठवत नाही. पोलीस ठाण्यात जाऊन मी पलंगाचा ठावा कापून दिला. जो पलंगाचा ठावा कापून दिला, तो मी ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेला पलंगाचा ठावा तोच आहे. तो **<u>मटेरियल ऑब्जेक्ट क्र. १</u>** वर आहे. ज्या पलंगाचा ठावा मटेरियल ऑब्जेक्ट क्र. १ वर आहे तो पलंग मला आता दाखविला, तो तोच आहे. त्यावेळी तेथे पंच आणि पोलीस होते. त्यांची नांवे मला आठवत नाही. पोलीसांनी ठावा कापून घेतल्याबद्दल बयान घेतले होते का ते लक्षात नाही.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपासणी आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जे. डी. तायडे यांच्यामार्फत</u>**

२. मी दहावी नापास आहे. मी पोलीसांना मी जे काम करतो त्या संदर्भात प्रमाणपत्र दिले. हे खरे आहे की पोलीस ठाण्याची छोटीमोठी कामे मी पाहत असतो. त्यामुळे त्यांच्याशी माझा परीचय आहे. हे खरे नाही की आजही कोर्टात आल्यानंतर पोलीसांनी जे काही सांगायचे आहे ते समजावून सांगितले आणि मी ते वाचून पाहिले. कटरच्या कंपनीचे नांव आणि इतर विवरण तपासात नमूद नाही याविषयी मी सांगू शकत नाही. जो ठावा पोलीसांनी सांगितला तो मी प्रथम कट केला. खुनाच्या गुन्ह्यातला ठावा आहे असे पोलीसांनी सांगितले नव्हते. त्यावेळी त्या ठाव्यावर रक्ताचे डाग होते का ते मी पाहिले नाही. मी फक्त ते कट केले. हे खरे नाही की मी फॅब्रीकेशनचे काम करत नाही आणि मी मटेरिअल ऑब्जेक्ट क्र. १ वरील ठावा कटही करुन दिला नाही. हे खरे नाही की मी पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURT, MAHARASHTRA
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.04.01 18:07:42 +0530

मलकापूर.
दिनांक – ०१/०४/२०२५.

**(सं.वि. जाधव)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

वाचून दाखविले, बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत सकाळी ११.५५ वाजता सुरु करुन दुपारी १२.१४ वाजेपर्यंत नोंदविण्यात आला.)

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.04.01 18:07:50 +0530

मलकापूर.
दिनांक – ०१/०४/२०२५.

**(सं.वि. जाधव)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

साक्षीपुराव्याची प्रत मिळाली.

| | |
|---|---|
| सरकारी अभियोक्तांची सही | |
| साक्षीदाराची सही/अंगठा | |
| आरोपींच्या वकीलांची सही | |